पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – १८

**सभावृत्तांत**

दिनांक - **२७/०२/२०१९** वेळ - दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पाक्षीक सभा **बुधवार** दिनांक **२७/०२/२०१९** रोजी दुपारी ३.०० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.चौगुले सीमा दत्तात्रय - सभापती**
२. मा.भोईर सुरेश शिवाजी
३. मा.घोलप कमल अनिल
४. मा.गायकवाड निर्मला मनोज
५. मा.निलेश हिरामण बारणे

या शिवाय मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.इंदलकर – सहा.आयुक्त मा.पुजारी,– कार्यकारी अभियंता, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) साई सफायर ते धनराज कॉम्पलेक्स येथील रस्त्याचे भूसंपादन करण्याबाबत.
- मा.सुरेश भोईर , मा.कमल घोलप यांचा प्रस्ताव

विषय क्र.३) चिंचवड चौक ते वखार महामंडळ(ksb चौक रोड) या रस्त्याचे भूसंपादन करणेबाबत.- मा.सुरेश भोईर , मा.कमल घोलप यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) पिंपरी , मिलींदनगर पुनर्वसन प्रकल्पातील इमारती परिसरातील स्थापत्य विषयक कामे करणेबाबत.- मा.निलेश बारणे , मा. सुरेश भोईर यांचा प्रस्ताव.

-------------

ठराव क्रमांक - ५१ विषय क्रमांक - ०१
दिनांक - २७/०२/२०१९ विभाग – झोनिपू
सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.सुरेश भोईर
संदर्भ: मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/८/कावि/१३९/२०१९, दि.१२/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत महराष्ट्र झोपडपट्‌टी अधिनियम १९७१ (सुधारणा, पुर्नवसन व पुर्नविकास इ.) नुसार संरक्षणपात्र झोपडीधारक यांना JNNURM/BSUP अंतर्गत सदनिका वाटप करणेत येतात त्याचप्रमाणे चिखली प्राधिकरण से.नं.१७ व १९ मध्ये EWS धारकांसाठी पात्रता व अटी शर्तीनुसार म्हाडा आरक्षण प्रमाणे सदर सदनिका वाटप करणेत येतात. तथापि अनाथ असणारे पती/पत्नी हे समाजाचे घटक असताना त्यांना BSUP अंतर्गत सदनिका देणेसंबंधी कोणतेही धोरण निश्चीत नाही. मनपा BSUP विभाग मान्यतेनुसार महाराष्ट्र शासनाने महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३ दिनांक-२/४/२०१८ अन्वये अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरीता शिक्षण व नोकरी यामध्ये खुल्या प्रवर्गातुन १% समांतर आरक्षण लागु करणेस मान्यता दिली आहे. यास्तव पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत अनाथ असणारे पती/पत्नी यांचेकरीता महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३ दिनांक २/४/२०१८ नुसारचे धर्तीवर अनाथ पती/पत्नी यांना BSUP अंतर्गत मनपामार्फत सदनिका वाटप संबंधीचे खालील अटी शर्तीनुसारचे धोरण मा.महापालिका सभा मान्यतेनुसार धोरण निश्चीत करणे आवश्यक आहे.

१) महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.अमुजा-२०११/ प्र.क्र.२१२ /का-३ दिनांक-२/४/२०१८ नुसार व वेळोवेळी शासनाचे यासंबंधी निर्गमीत होणारे शासन निर्णयानुसार BSUP अंतर्गत उपलब्ध असणारे सदनिकामध्ये अनाथ पती/पत्नी यांना खुल्या प्रवर्गातुन १% रक्कम समांतर आरक्षण ठेवणेत येईल.
२) महाराष्ट्र शासन महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र.संदर्भ २०१३/प्र.क्र.१०९/य३ दि. /६/२०१३ नुसार अनाथ असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.
३) अनाथ असणा-या पती किंवा पत्नी यांचे पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत कमीत कमी तीन वर्ष वास्तव्य असणे आवश्यक आहे. भाडयाने राहत असलेस नोंदणीकृत भाडेकरार(लिव्ह ऍन्ड लायसन्स) आवश्यक आहे.
४) शासनाचे व पिंपरी चिंचवड मनपा योजनाअंतर्गत सदनिका मिळालेली नसावी.(हरकत घेतलेली नसावी) तसेच पिंपरी चिंचवड मनपा हद्दीत घर/जागा/सदनिका नसावी. याबाबत प्रतिज्ञापत्र आवश्यक असेल.
५) मनपाचे सदनिका उपलब्ध नसलेस अनाथ पती/पत्नी यांना सदनिका उपलब्ध करुन देणेसंबंधी मनपावर कोणतेही बंधन असणार नाही.
६) मनपा निश्चीत करतील त्या सदनिका किमतीच्या प्रमाणात(GST लागु असल्यास त्यासह) नियमानुसारची स्वहिस्सा रक्कम खुला प्रवर्गनुसार भरणे आवश्यक राहील.
७) अनाथ पती/पत्नी यांचे मतदार यादीत नाव असणे आवश्यक असेल तसेच रेशन कार्ड,पॅनकॉर्ड, आधार कार्ड आवश्यक असेल.
८) रहिवासी दाखला आवश्यक असेल.
९) मा.आयुक्त वेळोवेळी निश्चीत करतील त्या अटी/शर्ती बंधनकारक असतील तसेच सदर धोरणानुसार पात्र करणे सदनिका वाटप करणेचे अधिकार मा.आयुक्त यांना राहतील आणि

कोणतीही अटी/शर्ती,शासन निर्णय तरतुदींचा भंग केलेस दिलेली सदनिका कोणतेही कारण न देता रद्द करणे,स्वहिस्सा रक्कम जप्त करुन मनपा कोषागारात जमा करुन घेणेत येईल व त्यासंबंधीचे सर्व अधिकार मा.आयुक्त यांना असतील.

मनपा हद्दीतील श्री.सुजीत कुमार नाईक हेपती/पत्नी अनाथ असुन त्यांनीही BSUP अंतर्गत विशेष बाब म्हणुन सदनिका मिळणेस शासनास विनंती अर्ज केला होता. शासन नगर विकास विभाग यानी पत्र क्र.पीसीसी -३०१८/ प्र.क्र.२७८ /नवि-२२, दिनांक १२/११/२०१८ नुसार मनपा सभा मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करावी असे कळविले आहे. त्याप्रमाणे वरील प्रमाणे धोरण निश्चीत झालेनंतर श्री. सुजीत कुमार नाईक यांना BSUP अंतर्गत नियमानुसार सदनिका देणेत येईल. तरी वरील प्रमाणेचे अनाथ पती/पत्नी यांनाBSUP अंतर्गत सदनिका देणेकामीचे धोरण निश्चीती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ५२ विषय क्रमांक - ०२

दिनांक - २७/०२/२०१९

सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक : मा.कमल घोलप

संदर्भः मा.सुरेश भोईर , मा.कमल घोलप यांचा प्रस्ताव.-

प्रभाग क्रमांक २१ मधील साई सफायर ते धनराज कॉम्प्लेक्स येथील रस्ता गेल्या २५ वर्षापासून रखडलेला असून तेथील नागरिक रस्ता ताब्यात देत नसून त्या रस्त्याचे भूसंपादन करुन ताब्यात घेणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५३ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २७/०२/२०१९

सुचक : मा.सुरेश भोईर अनुमोदक : मा.कमल घोलप

संदर्भः मा.सुरेश भोईर , मा.कमल घोलप यांचा प्रस्ताव.-

KSB चौक ते वखार महामंडळ हा रस्ता भूसंपादन केलेला आहे पण त्या पुढील रस्ता म्हणजेच वखार महामंडळ ते रांका गॅस, चिंचवड स्टेशन चौक हा भाग भूसंपादन केलेला नाही. तसेच या भागात वाहतुकीच्या अनेक समस्या आहेत. लोकांना त्याचा त्रास होतो. तसेच भूसंपादन करणे गरजेचे असल्याने याकामी प्रस्तावात नमूद प्रमाणे भूसंपादन करणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५४ विषय क्रमांक - ०४

दिनांक - २७/०२/२०१९

सुचक : मा.निलेश बारणे अनुमोदक : मा.सुरेश भोईर

संदर्भ: मा.निलेश बारणे, मा.सुरेश भोईर यांचा प्रस्ताव.-

पिंपरी मिलिंदनगर पुनर्वसन परिसरातील इमारती परिसरातील स्थापत्य विषयक कामेकरणेच्या अंदाजपत्रकीय र.रु.२४,००,०००/-(अक्षरी र.रु.चोवीस लाख फक्त) च्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता घेणेकामी मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(**सीमा दत्तात्रय चौगुले**)
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१३४/२०१९
दिनांक :०५/०३/२०१९

(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.